MHAU050009322021

दाखल दिनांक :- ०३.०५.२०२१.
नोंदणी दिनांक :- ०३.०५.२०२१.
निकाल दिनांक :- २७.०४.२०२६.
कालावधी :- व. म. दि.
०४ ११ २४

**<u>दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वैजापूर, जि. औरंगाबाद यांचे न्यायालयात</u>**
**(**<u>पिठासीन अधिकारी : ए. बी. शेख</u>**)**

**<u>विशेष दिवाणी दावा क्र.१६/२०२१.</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| **१.** | सुनिता भ्र. बाळु सातपुते, | } | |
| | वय- ३८ वर्षे, धंदा - नोकरी, | } | |
| **२.** | धनश्री बाळु सातपुते, | } | |
| | वय- २० वर्षे, धंदा - शिक्षण, | } | |
| **३.** | अश्वीनी बाळु सातपुते, | } | |
| | वय- १६ वर्षे, धंदा - शिक्षण, | } | |
| | अ.ज्ञ.पा. कर्ता आई वादी क्र.१, | } | |
| | सर्व वादी रा. निवारा नगरी, वैजापूर, | } | |
| | ता. वैजापूर, जि. औरंगाबाद. | } | **...... वादी.** |

**<u>.. विरुध्द ..</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| **१.** | बकुबाई भ्र. बाबुराव सातपुते, | } | |
| | वय- ७१ वर्षे, धंदा - शेती व घरकाम, | } | |
| **२.** | राजु बाबुराव सातपुते, | } | |
| | वय- ४७ वर्षे, धंदा - ॲटो रिक्षा चालक, | } | |
| **३.** | अशोक बाबुराव सातपुते, | } | |
| | वय- ३८ वर्षे, धंदा - शेती, | } | |
| **४.** | पुनम भ्र. नितीन सातपुते, | } | |
| | वय- ३० वर्षे, धंदा - शेती व घरकाम, | } | |
| **५.** | मयुर नितीन सातपुते, | } | |
| | अ.ज्ञा.पा. कर्ता आई प्रतिवादी क्र.४, | } | |

६. अक्षरा नितीन सातपुते, }
अ. पा. कर्ता आई प्रतिवादी क्र.४, }
सर्व प्रतिवादी रा. जांभरगाव, ह.मु. महावितरण }
कार्यालया समोर, स्टेशन रोड, वैजापूर, }
ता. वैजापूर, जि. औरंगाबाद. } ...... **प्रतिवादी.**

---

**दावा: वाटप व शाश्वत मनाईहुकूमासाठी.....**

---

**विधिज्ञः**

**श्री. एस. एच. जानेफळकर, वादींकरीता.**
**श्री. सी. जे. हरीदास, प्रतिवादी क्र.१ ते ३ करीता.**
**श्री. पी. एस. साखरे, प्रतिवादी क्र.४ ते ६ करीता.**

---

## न्यायनिर्णय

(**दिनांक : २७.०४.२०२६**)

वादींनी प्रस्तुतचा दावा वादग्रस्त मिळकतींचे वाटप करुन त्यांचा हिस्सा ताब्यात मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**दावा मिळकतींचे वर्णन –**

२. **(अ)** वादी क्र.२ व ३ यांचे वडील व वादी क्र.१ यांचे पती मयत बाळु बाबुराव सातपुते यांची एकत्रीत कुटूंबाची मौज जांबरगाव, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद येथील गट क्र.१८ मधील २५ एकर १८ गुंठे जिरायत जमिनीपैकी १ हेक्टर १८ आर शेतजमीन (२ एकर ३८ गुंठे) पोटखराबसह, जिच्या चतुःसिमा खालीलप्रमाणेः

पुर्वेस – कारभारी कडे यांची जमीन,

पश्चीमेस – विठ्ठल माधव साठे,

उत्तरेस – ज्ञानेश्वर भाऊसाहेब व कारभारी रामचंद्र साठे,

दक्षीणेस – कडु रामचंद्र साठे.

**(ब)** कसबे वैजापूर येथील स्टेशन रोड वरील सरकारी वखार गोदामाच्या लगत

असलेला प्लॉट ज्याचा सि.स. न. ६०/२/१ मधील प्लॉट खरेदीने श्री. लक्ष्मण पांडुरंग भालेराव रा. वैजापूर यांच्या मालकीच्या व ताब्यातील प्लॉट ज्याची लांबी पूर्व–पश्चीम १२.१९ मीटर (४० फुट) व रुंदी दक्षिण–उत्तर ३.३५ मिटर (११ मिटर) ज्याचे एकुण क्षेत्रफळ ४०.८३ चौ.मी. मध्ये मयत सुनिल बाबुराव सातपुते यांचे नावे एकत्रीत कुटूंबाची मिळकत किंमत रक्कम रु.१८,०००/– खरेदीने खरेदीखत क्र.२५९३ दि.२७.०७.२००१ रोजी एकत्र कुटूंबासाठी घेतलेली आहे. ज्याची चतुःसिमा चतुःसिमा खालीलप्रमाणेः

पुर्वेस – सरकारी महामंडळ वखार व गोडाऊन,

पश्चीमेस – सरकारी रस्ता स्टेशन रोड, वैजापूर औरंगाबाद,

उत्तरेस – सरकारी वखाराची जागा,

दक्षीणेस – डॉ. मतसागर यांचा दवाखाना.

**(क)** कसबे वैजापूर, ता.वैजापूर येथील जमीन व प्लॉट ज्यांचा सि.स.न.७४९ क्षेत्र ३१३.२ चौ.मी. जो पूर्वी मयत बाबुराव सातपुते यांचे नावे होता व सध्या पी.आर. कार्ड मध्ये प्रतिवादी क्र.१ बकुबाई सातपुते यांचे नावे आहे. सदर प्लॉटची चतुःसिमा खालीलप्रमाणेः

पुर्वेस – वखार महामंडळ,

पश्चीमेस – स्टेशन रोड,

उत्तरेस – वखार महामंडळ,

दक्षीणेस – डॉ. मतसागर यांचा दवाखाना.

उपरोक्त नमुद मिळकतींस संक्षेपाकरीता 'दावा मिळकती' अगर 'वादग्रस्त मिळकती' असे संबोधले आहे.

**संक्षीप्तरित्या वादींचे कथनः–**

**३.** वादी क्र.१ सुनिता ही वादी क्र.२ धनश्री व वादी क्र.३ अश्वीनी यांची जन्मदाती आई आहे. वादी क्र.१ चे पती व वादी क्र.२ व ३ यांचे पिता बाळु बाबुराव सातपुते त्यांच्या कुटूंबासह जांबरगाव, ता.वैजापूर येथे रहात होते. बाळु सातपुते यांच्या

अपघाती मृत्यूनंतर वादी क्र.१ महाराष्ट्र राज्य महावितरण कार्यालय, अंदरसुल, ता.येवला, जि.नाशीक येथे कार्यरत आहे.

**४.** वादी क्र.२ व ३ यांच्या मयत वडीलांस प्रतिवादी क्र.२ व ३ हे भाऊ होते. त्यांचा तिसरा भाऊ देखील मयत झालेला आहे. प्रतिवादी क्र.४ ते ६ हे नितीनचे कायदेशीर वारस आहेत. प्रतिवादी क्र.१ ही प्रतिवादी क्र.२, ३ व मयत नितीनची आई आहे. वादी व प्रतिवादी क्र.१ ते ६ यांच्यामध्ये रक्ताचे नातेसंबंध आहे. वादींचे पुढे असे कथन आहे की, वादी व प्रतिवादी यांच्या दावा मिळकती वडीलार्जीत बिगर वाटपाच्या जमिनी आहेत. ते दावा मिळकतीत एकत्र वहिती करतात. कौटुंबिक व्यवस्था म्हणुन दावा मिळकती प्रतिवादींच्या नावावर आहेत. सदर मिळकतींचे आजपर्यंत वाटप झालेले नाही. वादी निवारा नगरी, वैजापूर येथे रहात असुन; प्रतिवादी क्र.१ ते ६ मौजे जांबरगाव येथे राहतात.

**५.** वादींचे पुढे असे कथन आहे की, वादी क्र.१ चे पती दि.०५.०३.२००६ रोजी मयत झाल्यानंतर प्रतिवादींनी त्यांना सांभाळण्यास व एकत्रीत राहण्यास विरोध केला. वादी क्र.१ ही महाराष्ट्र राज्य महावितरण कार्यालय, मौजे अंदरसुल येथे लिपीकाची नोकरी करुन तिचा व इतर वादींचा उदरनिर्वाह करत आहे. प्रतिवादी वादींना मदत करत नाहीत. उलट तिच्या पगारातून हिस्सा मागतात. प्रतिवादी क्र.१ हिने तिच्या विधिज्ञामार्फत वादी क्र.१ ला नोटिस पाठविली होती. त्यास त्यांनी उत्तर देखील पाठविलेले आहे. वादींचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ ही एकत्र कुटूंबाच्या मिळकती विक्री करण्याच्या विचारात आहे. सबब वादींनी दि.०५.०३.२०२१ रोजी प्रतिवादींकडे दावा मिळकतींचे वाटप करुन देण्याची मागणी केली असता, प्रतिवादींनी त्यांना शिवीगाळ करुन घराबाहेर काढुन दिले व त्यांना ''तुम्हाला हिस्सा देणार नाही, काय ते करायचे ते करा'' अशी धमकी दिली. त्यामुळे वादींना प्रस्तुत दावा दाखल करण्यावाचून पर्याय राहिला नाही. वादींनी त्यांचा दावा मंजुर करण्याची विनंती केली आहे.

६. प्रतिवादी क्र.१ ते ६ त्यांच्या विधिज्ञामार्फत हजर झाले, परंतु त्यांनी त्यांचा लेखी जवाब दाखल केला नाही. सबब प्रस्तुत प्रकरण त्यांच्या लेखी जवाबाविना विचाराधीन आहे.

७. वादींचे कथन, अभिलेखावरील कागदपत्रे व पुरावा यांचा एकत्रीत विचार करता; प्रामुख्याने पुढील वादप्रश्न माझ्या विचारार्थ उपस्थित झाले असुन, त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे नोंदवित आहेः

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | वादींनी दावा मिळकती त्यांच्या एकत्र हिंदु कुटूंबाच्या वडीलोपार्जीत मिळकती असल्याचे शाबीत केले काय? | .. | **होय** |
| २. | वादी त्यांच्या मागणीप्रमाणे दावा मिळकतींचे वाटप होवून विभक्त हिस्सा मिळण्यास पात्र आहेत काय? असल्यास हिस्सा किती? | .. | **बरोबर** |
| ३. | वादी त्यांच्या मागणीप्रमाणे निरंतरच्या मनाईहुकूमाचा दिलासा मंजुर होवून मिळण्यास पात्र आहेत काय? | .. | **नाही** |
| ४. | वादी त्यांच्या मागणीप्रमाणे निरंतरच्या मनाईहुकूमाचा घरभाड्याची रक्कम वसुल होवून मिळण्यास पात्र आहेत काय? | .. | **नाही** |
| ५. | अंतिम आदेश व हुकूमनामा काय ? | | **वादींचा दावा अंशतः मंजुर करणेत येतो.** |

८. वादींनी त्यांच्या दाव्याच्या समर्थनार्थ वादी क्र.१ चे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र (नि.क्र.२१) सादर केले असुन, मौजे जांबरगाव येथील गट क्र.१८ चा ७/१२ उतारा, वैजापूर येथील सर्वे क्र.६०/२ या मिळकतीचा ७/१२ उतारा, खाते क्र.३०१ चा ८-अ उतारा, अभिलेखावर दाखल केले आहे. याशिवाय नगर भूमापन

क्र.७४९ ची आखीव पत्रीका देखील अभिलेखावर दाखल केली आहे. वादींनी पुरावा संपल्याची पुरशीस नि.क्र.२६ वर दाखल केली आहे. प्रतिवादी क्र.१ ते ६ यांना त्यांचा पुरावा सादर करण्यासाठी पुष्कळ संधी देवून देखील त्यांनी कोणताही पुरावा दाखल न केल्यामुळे नि.क्र.१ वरील दि.१७.०१.२०२६ रोजीच्या आदेशान्वये त्यांचा पुरावा देण्याचा हक्क काढुन देण्यात आला व प्रकरण अंतिम युक्तिवादासाठी नेमण्यात आले.

**९.** वादी अगर प्रतिवादी यांच्या सुविद्य विधिज्ञांनी अंतिम युक्तिवाद करण्याचे कष्ट घेतले नसले तरी, वादींतर्फे लेखी युक्तिवाद (नि.क्र.२८) सादर करण्यात आला आहे.

## – कारणेमिमांसा –

**मुद्दे क्र.१ ते ५ बाबत : –**

**१०.** सर्व मुद्दे एकमेकांशी संलग्न व निगडीत असल्यामुळे, विवेचनाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रीत विचारात घेतले आहेत.

**११.** वादी क्र.१ तथा साक्षीदार क्र.१ सुनिता हिचे असे कथन आहे की, दावा मिळकती ह्या वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जीत मिळकती असुन, सदर मिळकतींचे अद्याप तोंडी अथवा लेखी वाटप झालेले नाही. वादी व प्रतिवादी दावा मिळकती एकत्रीत वहिती करीत होते व त्यातून मिळणारे उत्पन्न एकत्रीत घेत होते. कौटुंबिक व्यवस्था म्हणुन दावा मिळकती प्रतिवादींच्या नावावर आहे. सा.क्र.१ सुनिता हिचे पुढे असे कथन आहे की, तिचे पती बाळु यांच्या मृत्यू पश्चात प्रतिवादी क्र.३ ते ५ यांनी त्यांना सांभाळण्यास व एकत्रीत राहण्यास विरोध करुन त्यांना तेथुन काढुन दिले. वादींनी प्रतिवादींकडे दावा मिळकतींचे वाटप करु मागितले असता, प्रतिवादींनी त्यास नकार दिला व त्यांना शिवीगाळ करुन घराबाहेर हाकलून दिले.

**१२.** सा.क्र.१ सुनिताचा प्रतिवादींतर्फे उलटतपास घेण्यात आलेला

नाही. त्यामुळे तिचे वादग्रस्त मिळकतीच्या स्वरुपाबाबतचे विधान विनाआव्हानीत आहे. प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी त्यांचा लेखी जवाब दाखल करुन, दावा मिळकती त्यांच्या स्वकष्टार्जीत अगर स्वतंत्र मिळकती असल्याचे कथन केले नाही. त्यांनी वादींचे दावा मिळकतीबाबतचे कोणतेही कथन नाकारलेले नाही. तसेच दावा मिळकतींचे यापूर्वी वाटप झाल्याचा देखील बचाव घेतलेला नाही.

**१३.** वादींना सादर केलेला मौखिक आणि कागदोपत्री पुरावा विचारात घेता असे दिसुन येते की, या प्रकरणातील वादग्रस्त मिळकती ह्या वादी व प्रतिवादी यांच्या हिंदु एकत्र कुटूंबाच्या वडीलोपार्जीत मिळकती आहेत. जर सदर मिळकतींचे अद्याप वाटप झालेले नसेल, तर वादी दावा मिळकतींमधील त्यांचा हिस्सा वाटप होवून स्वतंत्र कब्जा मिळण्यास पात्र आहे.

**१४.** वादींचे दाव्यातील कथन व पक्षकारांचे एकमेकांशी असलेले नातेसंबंध विचारात घेता, वादग्रस्त मिळकतींमध्ये प्रतिवादी क्र.१ ते ३ तसेच मयत बाळु व नितीन यांचा प्रत्येकी १/५ हिस्सा असल्याचे स्पष्ट होते. सबब वादी दावा मिळकतींमध्ये असलेला मृतक बाळु याचा १/५ हिस्सा वाटप होवून स्वतंत्र ताबा मिळण्यास पात्र आहे. वादींनी वाटपाशिवाय निरंतरच्या मनाईहुकूमाचा दिलाश्याची देखील मागणी केली आहे. परंतु निरंतरच्या मनाईहुकूमाचा दिलासा मंजुर करण्यासाठी आवश्यक असलेले घटक अभिलेखावर आणलेले नाहीत. वादींनी त्यांच्या हिस्यास येणा–या मिळकतीच्या भाड्याची रक्कम देखील त्यांच्या लाभात मंजुर करण्याची मागणी केली आहे. परंतु प्रस्तुत प्रकरण हे घरमालक व भाडेकरु यांच्यातील वादाचे नसल्यामुळे त्यांच्या मागणीप्रमाणे भाड्याची रक्कम त्यांच्या लाभात वसुल करुन देता येणार नाही.

**१५.** उपरोक्त विवेचनाचा विचार करता, मुद्दे क्र.१ व २ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात येत असुन मुद्दे क्र.३ व ४ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहे. मुद्दे क्र.१ व २ चे निष्कर्षावरुन वादींचा दावा अंशतः मंजुर होण्यास पात्र आहे.

सबब मुद्दा क्र.५ च्या उत्तरादाखल व न्यायाचा सुयोग्य शेवट होण्यासाठी पुढील अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहेः

आदेश

१. वादींचा दावा (वि.दि.दा. क्र.१६/२०२१) अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा दावा मिळकतीमध्ये प्रत्येकी १/५ हिस्सा असल्याचे तसेच एकत्रीतरित्या वादी क्र.१ ते ३ आणि प्रतिवादी क्र.४ ते ६ यांचा प्रत्येकी १/५ हिस्सा असल्याचे घोषीत करण्यात येते.

३. हुकूमनामा अंमलबजावणीसाठी दिवाणी प्रक्रिया संहितेचे कलम ५४ अन्वये मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यात यावा.

४. येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करणेत यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by AYYUB BABU SHAIKH
Date: 2026.04.27 14:58:46 +0530

**(ए. बी. शेख)**

दिनांकः २७/०४/२०२६.    दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
वैजापूर.